# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## सेंट विन्सन्ट पालोटी महाविद्यालयाकरता महा मेट्रो आणि मनपा, नागपूर तर्फे फीडर सेवा ०१ एप्रिल पासून



नागपूर: नागपूर शहरातील जास्तीत जास्त नागरिकनांनी सार्वजनिक वाहतूक सेवा - मेट्रो व आपली बस वापरावी व त्याद्वारे प्रदूषण कमी करण्यात प्रत्यकाने भूमिका बजवावी असे आव्हान महा मेट्रो तर्फे नेहमीच करण्यात येते. त्यासाठी शहरातील विविध शैक्षणिक औद्योगिक शासकीय निमशासकीय, निवासी संकुले इ संस्थामध्ये "मेट्रो संवाद" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते व त्यातुन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरण्याचे फायदे व दिल्या जाणाऱ्या सवलती बाबत विस्तृत माहिती दिली जाते.

याच श्रृंखलेत सेंट व्हिन्सेंट पलोटी अभियांत्रिकी महाविद्यलयात मेट्रो व मनपातर्फे संयुक्तरित्या मेट्रो संवादाचे आयोजन करण्यात होते आणि लगेच दिनांक ११ मार्च रोजी शिक्षक व विद्यार्थ्यांचे महाकार्ड व बसपास तयार करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आणि पहिल्याच दिवशी १५ शिक्षक व २८ विद्यार्थ्यांचे महाकार्ड व बस पास करण्याची प्रक्रीया पूर्ण करण्यात आली. यात कॉलेजच्या शिक्षकांचा महत्वपूर्ण सहयोग होता.

महाविद्यालयात विविध भागात राहणारे शिक्षक व विद्यार्थी मेट्रोने साऊथ एअरपोर्ट स्टेशन पर्यंत पोहचतील व स्टेशनपासून कॉलेजपर्यंत मनपाची इ-फीडरबस सेवा उपलब्ध राहील. सदर सेवा ०१ एप्रिल (मंगळवार) सुरु करण्याचे ठरले.

महाविद्यालयात कॅम्प पुन्हा घेण्यात येणार असुन उर्वरित इच्छुक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे महाकार्ड व बस पास करण्याची प्रक्रीया टप्याटप्यात पूर्ण करण्यात येईल. महामेट्रोचे पुढाकाराने व मनपाचे सहकार्याने यापूर्वी मिहानमधील कंपन्यांचे अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी खापरी मेट्रो स्टेशनपासुन १० विशेष फीडरबसेसची सोय करण्यात आली आहे तसेच प्रजापतीनगर मेट्रो स्टेशनपासुन वाठोडा येथील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी सुद्धा फीडरबसेसची सोय करण्यात आली आहे.

तसेच आतापर्यंत महामेट्रोचे विनंतीनुसार मनपाचे ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंटतर्फे १० मार्गांचे रॅशनलायझेशन करण्यात आले असुन ४ नवीन फीडर मार्ग सुरु करण्यात आले आहे. या शिवाय नागपूर विमानतळापासून एरपोर्टमेट्रो स्टेशनपर्यंत सुद्धा फीडर सर्विस फेब्रुवारी २०२४ पासुन सुरु करण्यात आली आहे.